# दुष्काळ आणि ऊसशेतीचं चुकलेलं गणित

गुरुदास नूलकर

**गोड्या पाण्याचा सर्वाधिक, म्हणजे सुमारे सत्तर टक्के वापर शेतीत होतो. त्यामुळे आपल्या शेतीत असा काय बदल झाला आहे ज्यामुळे पाणी पुरत नाही, हे तपासून त्यावर उपाय शोधणं गरजेचं आहे. अनिर्बंध ऊसशेती हे आपल्या चुकलेल्या गणिताचं एक महत्त्वाचं कारण आहे हे मांडणारा लेख.**

➤ मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात दुष्काळाने पुन्हा डोळ्यांतून पाणी काढलं. सहा वर्षांत चौथ्यांदा ही परिस्थिती आली आहे. त्यामुळे सरकारचं 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' हे धोरण नक्की कशावर आधारित आहे, आशेवर का चमत्कारावर, हे समजत नाही. कारण पाऊस काही सरकारच्या हातात नाही, आणि पाणीवापरावर निर्बंध लावले तर विरोधक सरकारच्या डोळ्यांतून पाणी काढतील. मग निसर्गाने दिलेल्या पुरवठ्यात राज्य दुष्काळमुक्त कसं होणार हे गूढच आहे. गोड्या पाण्याचा सर्वाधिक, म्हणजे सुमारे सत्तर टक्के वापर शेतीत होतो. त्यामुळे आपल्या शेतीत असा काय बदल झाला आहे ज्यामुळे पाणी पुरत नाही, हे तपासून त्यावर उपाय शोधणं हा स्वाभाविक मार्ग असला तरी प्रत्येक सरकारने आजवर याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं आहे.

सर्वाधिक पाणी लागणाऱ्या पिकांपैकी ऊस हे एक अग्रगण्य पीक आहे. गेल्या शंभर वर्षांत धरणांमुळे भारताच्या कानाकोपऱ्यात पाणीसाठे वाढले आणि ऊसशेतीत मोठी वाढ झाली. महाराष्ट्रात फक्त चार टक्के जमिनीवर ऊसशेती असली तरी सिंचनाचं ७० टक्के पाणी






त्यासाठी वापरलं जातं, असं माधव चितळे समितीच्या अहवालात मांडलेलं आहे. फडणवीस सरकारने ऊसशेतीसाठी ठिबक सिंचन बंधनकारक केलं असलं तरी प्रत्यक्षात फक्त २५ टक्के ऊसशेतीत ही यंत्रणा कार्यान्वित आहे. महाराष्ट्रातील उसाचा उतारा सुमारे १० ते ११ टक्के मिळतो. म्हणजे एक क्विंटल उसापासून १० ते ११ किलो साखर मिळते. थोडक्यात, एक किलो साखर उत्पादनास लागणाऱ्या उसाने साधारण २५०० लिटर पाणी प्यायलेलं असतं, असं संशोधनातून निष्पन्न होतं. म्हणजेच, महिन्याला तीन किलो साखर वापरणाऱ्या शहरी घरात ऊस शेतकऱ्याचं ७५०० लिटर पाणी गेलेलं असतं. सरकारने भीमा, कृष्णा, गोदावरी यांबरोबरच इतर अनेक छोट्या-मोठ्या नद्यांवर धरणं बांधून दुष्काळी भागातही पाणी उपलब्ध करून दिलं आहे. अशा ठिकाणी पर्जन्यवृष्टीवर आधारित पारंपरिक पीकपद्धती जाऊन काही वर्षांतच ऊसशेती होऊ लागली. साहजिकच साखर कारखान्यांची संख्या वाढली. महाराष्ट्रात आज १९५ कारखान्यांतून सुमारे १०७२ लक्ष क्विंटल साखर बनते. गेल्या वर्षीपेक्षा हा आकडा सहा लक्ष क्विंटलने अधिक आहे.

ऊस लावण्याचे शेतकऱ्याला अनेक फायदे आहेत. ऊसशेतीत तुलनेने कमी कष्ट असतात आणि दलालांच्या कचाट्यात सापडण्यापेक्षा कारखान्याला उसाचा पुरवठा करणं शेतकऱ्याला जास्त सुरक्षित वाटतं. पण उसाकडे वळण्याचं मुख्य कारण म्हणजे त्यातून मिळणारा आर्थिक नफा. 'कमिशन फॉर ॲग्रिकल्चरल कॉस्ट्स अँड प्रायसेस (सी.ए.सी.पी)' या संस्थेच्या अंदाजानुसार भात आणि गहू ही दोन पिकं घेऊन जितका फायदा होतो त्याच्या ७० टक्के जास्त फायदा ऊसपिकात होतो. त्यामुळे सिंचनाची सोय होताच बहुतांश शेतकरी ऊस लागवड करतात. तसंच, स्पर्धात्मक वातावरण असल्याने ज्या शेतकऱ्यांना धरणाचा पाणीपुरवठा होत नाही ते बोअरवेल खणून उसाला पाणी उपसतात.


पण राज्यात उसाचं पीक किती घ्यावं आणि त्याचा साखरेच्या मागणीशी काही ताळमेळ आहे का? आश्चर्य म्हणजे याचं उत्तर 'नाही' असं मिळतं. २०१७-१८ या वर्षात महाराष्ट्रात २३.२८ लक्ष टन साखरेची मागणी असताना ९०.५ लक्ष टन उत्पादन झालं; संपूर्ण देशाची मागणी २५०.७ लक्ष टन असताना २७२.७ लक्ष टन साखरेचं उत्पादन झालं. गेल्या वर्षीचा उर्वरित माल आणि यंदाचं अतिरिक्त उत्पादन सरकारी गोदामात पडून राहण्यापेक्षा निर्यात करणं योग्य, असं म्हणून २०१८ च्या अखेरपर्यंत भारतातून आठ लक्ष टन साखर निर्यात झाली.

पण निर्यातीच्या मार्गाने आपलं २०० कोटी घनमीटर पाणी इतर देशांच्या घशात गेलं! निर्यातीतून आपल्याला परकीय चलन मिळालं आणि आपला 'बॅलन्स ऑफ ट्रेड' सुधारला हे खरं. पण या व्यवहारात एका अपुऱ्या नैसर्गिक संसाधनाचा हिशेब न लावल्याने देशाच्या पर्यावरणीय आणि सामाजिक नुकसानाची गणना कोणत्याच खात्यात होत नाही. सरकारने साखर कारखान्यांना आदेश दिले आहेत, की सरसकट सर्व शेतकऱ्यांना 'फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस' (एफ.आर.पी.) म्हणजे 'न्याय्य आणि रास्त भाव' द्यावेत. हा भाव ऊसशेतीचा खर्च व उसाचा उतारा यांचा विचार करून काढलेला आहे. त्याऊपर काही राज्यांत 'स्टेट ॲडव्हाइस्ड प्राइस' म्हणजे राज्याने सुचविलेली किंमत आहे, जी एफ.आर.पी.हून जास्त आहे. पण याच कारणामुळे अतिउत्पादनाची समस्या निर्माण झाली आहे.

मुक्त बाजारपेठेत कोणत्याही वस्तूचा भाव हा त्याच्या मागणी आणि पुरवठ्यावर ठरतो. साखरेचं उत्पादन मागणीपेक्षा जास्त झालं तर त्याचे भाव पडणार हे निश्चित. आणि तसंच झालं. पण तरीही एफ.आर.पी. मिळत आहे म्हटल्यावर शेतकरी ऊस घेत राहिले. एफ.आर.पी. भावाने ऊसखरेदी केलेल्या कारखान्यांना बाजारभावाने साखर विकणं परवडत नाही. काही कारखाने तोट्यात जातात तर काहींचं खेळतं भांडवलचक्र कोलमडतं. यंदा महाराष्ट्रात हे चित्र स्पष्ट दिसलं. उत्तम उतारा मिळणाऱ्या कारखान्यांकडेही शेतकऱ्यांची देणी थकलेली आहेत. अनेक कारखाने कर्जात अडकले आहेत. काही कारखाने शेतकऱ्यांना एफ.आर.पी.पेक्षा कमी भाव देऊ करत आहेत. पिकाचा मोबदला



**गुरुदास नूलकर** पर्यावरणीय व्यवस्थापनातील तज्ज्ञ असून इकॉलॉजिकल सोसायटीचे विश्वस्त आहेत. सिंबायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट इथे ते प्राध्यापक आहेत.




वेळेवर न मिळाल्याने सातारा, सांगली आणि कोल्हापूर भागातील काही कारखान्यांची कार्यालयं शेतकऱ्यांनी नुकतीच पेटवून दिली. अशी परिस्थिती असताना सी.ए.सी.पी.च्या 'ऊसशेतीत ७० टक्के जास्त फायदा' या विधानाला काहीच अर्थ राहत नाही. इतकंच नव्हे, तर नोव्हेंबर २०१६ पासून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील साखरेचे भाव आपल्यापेक्षा कमी असल्याने साखर आयात करून विकणं फायदेशीर ठरत आहे.

साखर कारखान्यांची परिस्थिती फक्त ऊस शेतकऱ्यांना बाधक नाही, तर आम जनतेलाही त्याची झळ पोचू शकते. अनेक कारखान्यांनी आपला साखरेचा साठा तारण ठेवून बँकेतून कर्जं घेतली आहेत. आता त्या साठ्याचा बाजारभाव घसरल्याने काही बँकांची कर्जवसुली धोक्यात आली आहे. लवकरच ही समस्या बँकेच्या इतर ग्राहकांच्या माथी पडू शकते. गेल्या दहा वर्षांत साखर कारखान्यांचे 'रिटर्न ऑन इनव्हेस्टमेंट' आणि नफा घटत चालला आहे, असं 'इंडियन शुगर मिल्स असोसिएशन'च्या २०१५च्या अहवालात स्पष्ट दिसत आहे.


अशा परिस्थितीत साहजिकच सरकारला कारखान्यांना मदत करणं भाग आहे. सरकार अनेक मार्गांनी त्यांना अर्थसाह्य करत आहे. उदाहरणार्थ, साखर निर्यात करण्यासाठी १००० ते ३००० रुपये प्रति टन इतकी मदत कारखान्यांना मिळू शकते. इथेनॉल उत्पादनाची सामग्री घेण्यासाठी सरकारने कारखान्यांना ८५०० कोटी रुपयांचं पॅकेज दिलं आहे, ५५०० कोटी रुपयांचं पॅकेज उत्पादक आणि ऊस वाहतुकीसाठी देऊ केलं आहे. याव्यतिरिक्त ऊस शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी मदत, गटशेती स्कीम, कर्जावरील व्याज अनुदान अशा अनेक योजना चालू आहेतच. आजपर्यंत महाजन, थोरात, नंदकुमार, रंगराजन अशा अनेक समित्यांनी आपले अहवाल सादर केले आहेत. गेली अनेक वर्षं करदात्यांचा पैसा साखर उत्पादनात जात असला तरी या व्यवसायाने शेतकरी आणि कारखान्यांचं नशीब काही बदललं नाही. उलट, धरणांच्या मोठ्या साठ्याने आणि सरकारी मेहेरनजर असल्याने अधिक शेतकरी ऊस घेण्यास प्रवृत्त होत आहेत. आज मराठवाड्यातील रिकामी धरणं याला साक्ष आहेत.

साखर व्यवसायाच्या वाढीकडे कानाडोळा करणं हे पाणीसमस्या आणखी गंभीर बनवण्यास कारणीभूत असेल तर साखरनिर्यातीला प्रोत्साहन देणं हा प्रशासनाचा बेजबाबदारपणा आहे. कोरडवाहू भागात उसाचं पीक घेऊन इतर शेतकऱ्यांवर अन्याय करणारे शेतकरी सरकारी अनुदानाला पात्र ठरतात, यातून फक्त आपल्या धोरणातील अविचार दिसतो.

या समस्येच्या मुळाकडे जाताना आणखी एक प्रश्न पडतो. घरगुती वापराला एक मर्यादा असताना साखरेची मागणी इतकी वाढलीच कशी? याची मुख्यतः दोन कारणं आहेत. पहिलं कारण म्हणजे देशातील बदलती खाद्यसंस्कृती. प्राचीन भारताला उसाचा उपयोग माहीत होता, परंतु पहिला साखर कारखाना भारतात सुरू झाला तो १८२० ते १८४० च्या दरम्यान. त्यापूर्वी स्वयंपाकात मध, गूळ आणि खांडसरीचा वापर होत असे. पुढे साखर उपलब्ध झाल्याने त्याचा वापर वाढत गेला आणि आज बहुतांश घरांतून साखरच वापरली जाते. त्याचबरोबर पारंपरिक गोड पदार्थ औद्योगिक पद्धतीने बनू लागले आणि सणासुदीची पक्वान्नं रोज उपलब्ध झाली. श्रीखंड, बासुंदी, मिठाई, रसगुल्ले असे पदार्थ बाजारात सहज उपलब्ध झाल्याने त्यांची मागणी वाढली आणि औद्योगिक पद्धतीने त्यांचं उत्पादन वाढत गेलं. त्यांच्या मागणीने साहजिकच साखरेची मागणी वाढली.

साखरेची मागणी वाढण्याचं दुसरं कारण म्हणजे शीतपेयं आणि पाकीटबंद खाद्यपदार्थांचे जागतिक ब्रँड भारताच्या बाजारपेठेत आले. या व्यवसायात मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर होतो. जाहिरातबाजीने आज या पदार्थांच्या मागणीत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. सॉफ्टड्रिंक्स, ज्यूस आणि मॉल्टेड पेयं, आबालवृद्धांसाठी विशिष्ट पेयं, मद्यपेयं असे अनेक प्रकार यात आले. वेफर्स, कुरकुरे, चिप्स, शेव-फरसाण अशा पदार्थांतही साखरेचा वापर होतो. भारतात स्नॅक फुड, म्हणजे पाकीटबंद खाद्यपदार्थांचे शंभरहून अधिक ब्रँड आहेत. शीतपेय आणि पाकीटबंद खाद्यपदार्थांचा व्यवसाय किती वाढला हे सोबतच्या आलेखात दिसतं.

**पाकीटबंद खाऊच्या उत्पादनातील वाढ**




या दोन्ही व्यवसायांत मोठाले जागतिक व भारतीय ब्रँड आहेत. या अत्यंत किफायतशीर धंद्यात बहुतांश कंपन्या नफ्यात आहेत. या बड्या कंपन्या साखर व्यवसायाच्या अनुदानाच्या आणि आभासी पाणीप्रवाहाच्या मोठ्या लाभार्थी आहेत, याचा विचारही धोरणात होत नाही. उलट, आमची धोरणं शेतकऱ्यांच्या हिताची कशी आहेत यावर चर्चा होते. कर्जबाजारी कारखाने, रिकामी धरणं आणि करदात्यांच्या पैशाचा अपव्यय, हे प्रश्न नसून चुकीच्या धोरणांचे परिणाम आहेत; पण प्रशासन हे कधीच लक्षात घेत नाही. शेतकऱ्याला अपेक्षित मोबदलाच मिळत नसला, तर धोरणात काही तरी मुलभूत चूक आहे, त्यावर फेरविचार झाला पाहिजे, हा विचार न करता चालू योजनेची आर्थिक तरतूद वाढवत राहणं आणि समित्या बसवून त्यांचे अहवाल स्वीकारत राहणं हा मार्ग सरकारला उपयुक्त वाटतो. 'पाणी पंचायत'चे विलासराव साळुंके म्हणायचे, की 'राज्य दुष्काळमुक्त होण्यासाठी पाणीपुरवठा वाढवता येणार नाही, पाणीवापर नियंत्रित आणि समन्यायी झाला पाहिजे.' आज नेमकं याकडेच प्रशासनाचं दुर्लक्ष होत आहे.

देशातील साखरेचा वापर आज गरजेकडून चैनीकडे चालला आहे. निसर्गाने आपल्याला अवघे चार महिने पाऊस दिला आहे, त्यामुळे धोरणं आखताना आपल्याला अनेक दृष्टिकोनांतून विचार करायला हवा आहे. शेतकऱ्यांना ऊस पिकवायला मदत करायची का त्यांचं उत्पन्न वाढवण्याच्या योजना आखायच्या? साखर उत्पादनाची सामाजिक आणि पर्यावरणीय किंमत करदात्यांच्या माथी का मारायची? साखर व्यवसायातील सर्व लाभार्थी अनुदानाच्या पात्रतेचे आहेत का? कमी पर्जन्यमान क्षेत्रात उसाला प्रोत्साहन द्यायचं का कमी पाण्याच्या पिकांना अर्थसाह्य करायचं? साखरेची किंमत वापरावर ठरवता येईल का? घटलेले पाणी साठे आणि कारखान्यांची थकबाकी याचा सर्वाधिक तोटा छोट्या शेतकऱ्यांना होत आहे. उसाला सक्षम पर्याय मिळाला तर शेतकऱ्यांना मोबदला तर मिळेलच पण त्यांच्या भागातील पाणी तुटवडा कमी होण्यास हातभार लागेल, तसंच साखरेचं अतिरिक्त उत्पादन कमी झाल्याने पाण्याचा अपव्यय टाळता येईल. दुष्काळमुक्त होण्यासाठी या गोष्टींचा विचार होणं गरजेचं आहे. निर्यातीसाठी अनुदान आणि कारखान्यांना कर्जमाफी या गोष्टींचा पाणीसाठ्यावर विपरीत परिणाम होत आहे आणि होत राहणार.

असं म्हटलं जातं, की महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा सर्वांत जास्त फायदा राजकीय नेत्यांना झाला. मग आता त्याच नेत्यांनी या गोष्टींवर विचार करून दुष्काळमुक्त राज्यासाठी अशा दृष्टिकोनातून विचार करून धोरणं मांडायला हवी. अन्यथा, येणाऱ्या काळात दुष्काळ निवारणाच्या खर्चात प्रचंड वाढ होत राहणार आहे, त्याची तरतूद करायला हवी.

■ **गुरूदास नूलकर**
९८२२०३४५७९
gurudasn@gmail.com

**अनुभव**
**वर्गणीदार व्हा**

आपल्या आसपास घडणाऱ्या पण आपल्या विचारविश्वाचा भाग नसणाऱ्या घडामोडी समजून घ्याव्यात, त्या घडामोडींचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा,आपल्या म्हणण्यापल्याडचे काही दृष्टिकोन समजून घ्यावेत, आपल्याला न दिसणारं जग जाणून घ्यावं असं आम्हाला वाटतं.
त्यामुळेच 'अनुभव' मासिकाचा दर महिन्याचा अंक म्हणजे आपला भवताल, आपला समाज समजून घेण्यासाठीची धडपड असते.
'अनुभव'च्या परिवाराचा एक भाग बनून तुम्हीही या प्रवासात सामील होऊ शकता.
'अनुभव'चे वर्गणीदार बना.
आजच फोन करा : **९०११०७४३६०/९९२२४३३६१४**